वाशिम:-मालेगाव तालुक्यातील जोडगव्हाण येथे ४० फुट खोल विहिरीत एका जणाचा बुडून झाला. सदर घटनेची माहिती जऊळका पोलिस स्टेशन चे पोलिस निरीक्षक श्री. आदिनाथ मोरे यांनी श्रीमती. साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा रासेयो आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाचे सदस्य यांना दिली. व मृतदेह शोधून बाहेर काढण्यासाठी पथकाला पाचारण केले. यावेळी तत्काळ पथकाचे सदस्य राहुल साखरे, प्रविण गावंडे, ओम वानखडे, सुमित राठोड, अनिकेत इंगळे, बुध्दभुषण सुर्वे, सचिन राठोड, ज्ञानेश्वर खडसे, आदित्य इंगोले आदि सदस्य सर्व सुरक्षित साहित्यांसोबत घटनास्थळी दाखल झाले.

व पोलिस निरीक्षक श्री. मोरे यांच्या परवानगीने १५ फुट खोल गहूल पाण्यात गाळात फसलेल्या मृतदेह शोधण्यासाठी सर्च ऑपरेशन सुरू केले. पण सर्च ऑपरेशन करून देखील मृतदेह मिळत नव्हता. यानंतर पथकाच्या सदस्यांनी स्पेशल सर्च ऑपरेशन राबविले. व अवघ्या १५ मिनिटामध्ये गाळात फसलेला मृतदेह शोधून बाहेर काढले. सदर मृतकाचे नाव गजानन तानाजी आढमने ( वय ४२ वर्ष) असल्याचे समजते.

PRINCIPAL,
Smt. Salunkabai Raut Arts &
Commerce College, WANOJA
Tq.Mangrulpir, Dist.Washim
(M.S.) Pin Code- 444402

SMT. SALUNKABAI RAUT ARTS & COMMERCE COLLEGE * WANOJA *
Tq.Mangrulpir,
Dist.Washim
(M.S.) 444402

# निलगाय आडवी आल्याने दुचाकीचा अपघात

वाशिम संदेश, फुलचंद भगत



वाशिम:-शेलुबाजार वरुन वाशिम ला जात असताना तांदळी-शेवई फाट्यावर अचानक रस्ता ओलांडताना नीलगाय आडवी आल्याने दुचाकीवरील नियंत्रण सुटुन अपघात झाला. सदर अपघाताची माहिती श्रीमती. साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा रासेयो आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाचे सदस्य राहुल साखरे यांना मिळताच ते तत्काळ आपले सहकारी सत्यम अवगण, जगदेव अवगण यांच्या सोबत घटनास्थळी दाखल झाले.या अपघातात दुचाकी वरील दोन जण जखमी झाले होते. वडील दत्ता बळीराम साखरे ( वय ५५ वर्ष) व मुलगा राजाराम दत्ता साखरे ( वय १७ वर्ष) असे जखमींचे नावे आहेत. यापैकी वडील दत्ता साखरे हे गंभीर जखमी झाले होते. यावेळी ११२ ला फोन करून संबंधित घटनेची माहिती पथकाच्या सदस्यांनी दिली. त्यानंतर तत्काळ १०८ ला फोन केला यावेळी रुग्णवाहिकेचे चालक चंद्रकांत मुखमाले व डॉ. निलम हे तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. व रुग्णवाहिकेतुन सदर जखमींना जिल्हा ग्रामीण रुग्णालय वाशिम येथे उपचारासाठी दाखल केले. रासेयो आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाच्या सदस्यांनी वेळीच तत्परता दाखविल्यामुळेच जखमींना वेळीच वैद्यकीय सेवा उपलब्ध झाली.



# वशिम जिल्हयातील रस्ते अपघातातील जखमी इसमांना तात्काळ मदत करणाऱ्या विदयार्थ्यांचे पोलीस अधिक्षक श्री. बच्चन सिंह यांचेकडुन सत्कार



[illegible]

Ghorpade
PRINCIPAL,
Smt. Salunkabai Raut Arts & Commerce College, WANOJ
Tq.Mangrulpir, Dist.Washim
(M.S.) Pin-444402

SALUNKABAI RAUT ARTS & COMMERCE COLLEGE
Tq.Mangrulpir,
Dist.Washim
(M.S.) 444402
SMT. * WANOJA *

दैनिक
# विदर्भ केसरी

# निलगाय आडवी आल्याने दुचाकीवरील नियंत्रण सुटुन अपघात.

## रासेयो आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाचे मदतकार्य





प्रमोद सावळे
मंगरुळपीर (प्रतिनिधी)

शेलुबाजार वरून वाशिम ला जात असताना तांदळी-शेवई फाट्यावर अचानक रस्ता ओलांडताना नीलगाय आडवी आल्याने दुचाकीवरील नियंत्रण सुटुन अपघात झाला. सदर अपघाताची माहिती श्रीमती. साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा रासेयो आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाचे सदस्य राहुल साखरे यांना मिळताच ते तत्काळ आपले सहकारी सत्यम अवगण, जगदेव अवगण यांच्या सोबत घटनास्थळी दाखल झाले.या अपघातात दचुाकी वरील दोन जण जखमी झाले होते. वडील दत्ता बळीराम साखरे ( वय ५५ वर्ष) व मुलगा राजाराम दत्ता साखरे ( वय १७ वर्ष) असे जखमींचे नावे आहेत. यापैकी वडील दत्ता साखरे हे गंभीर जखमी झाले होते. यावेळी ११२ ला फोन करून संबंधित घटनेची माहिती पथकाच्या सदस्यांनी दिली. त्यानंतर तत्काळ १०८ ला फोन केला यावेळी रुग्णवाहिकेचे चालक चंद्रकांत मुखमाले व डा ॅ. निलम हे तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. व रुग्णवाहिकेतुन सदर जखमींना जिल्हा ग्रामीण रुग्णालय वाशिम येथे उपचारासाठी दाखल केले. रासेयो आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाच्या सदस्यांनी वेळीच तत्परता दाखविल्यामुळेच जखमींना वेळीच वैद्यकीय सेवा उपलब्ध झाली.

PRINCIPAL,
Smt. Salunkabai Raut Arts &
Commerce College, WANOJA
Tq.Mangrulpir, Dist.Washim
(M.S.) Pin Code- 444402

दिव्य मराठी अकोला सिटी 17-06-2022

SMT. SALUNKABAI RAUT ARTS & COMMERCE COLLEGE * WANDJA *
Tq.Mangrulpir, Dist.Washim (M.S.) 444402

# कुझर, बोलेरोच्या भीषण अपघातात ११ जण जखमी



अपघातातील जखमींना रुग्णवाहिकेत बसवताना रासेयोचे पदाधिकारी.

**प्रतिनिधी** | अकोला

नागपूर - औरंगाबाद द्रुतगती महामार्गावरील पेडगावजवळ बुधवारी रात्री २ वाजता पुण्यावरून नागपूरकडे भरधाव जाणाऱ्या बोलेरो पीकअपने विरुद्ध दिशेने येणाऱ्या क्रुझरला धडक दिली. क्रुझरमधील प्रवासी छिंदवाडा येथून देवदर्शन करून मालेगाव कडे जात असताना हा अपघात घडला. अपघातात ११ जण जखमी झाले होते.

श्रीमती साळुंकाबाई राऊत महाविद्यालयाच्या रासेयो आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाला घटनेची माहिती मिळताच सदस्य अनिकेत इंगळे व बुध्दभूषण सुर्वे यांनी घटनास्थळी धाव घेतली. समन्वयक प्रा. बापूराव डोंगरे यांना अपघाताची माहिती पोलिस व डायल ११२ वर दिली. यामुळे डायल १०८ वरून रुग्णवाहिका उपलब्ध झाली. बचाव पथकाने पोलिसांच्या मदतीने सर्व जखमींना शेलुबाजार येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये आणले. येथे प्राथमिक उपचार करून जखमींना पुढील उपचारासाठी अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पाठवण्यात आले.

जखमींमध्ये संदिप कांबळे, सुदर्शन सांगळे, प्रभाकर कांडे, विनोद कुमार, ओमप्रकाश फलेजिया, नाथिराज मनवरकर, राजेंद्र थोंडे, राजीव टिकाईत, विलास पुरकटे, धनंजय रोकडे व मानसिंग खोकर यांचा समावेश आहे. यामध्ये ६ जण गंभीर जखमी असून त्यांच्यावर अकोला येथे उपचार सुरू आहे. यावेळी जखमींसोबत कोणीच नसल्यामुळे पथकाच्या सदस्यांनी जखमींना रुग्णालयात भरती केले.

अपघात एवढा भीषण होता की, क्रुझरमधील प्रवासी बाहेर फेकल्या गेले. अपघातामुळे अर्धा तास वाहतूक विस्कळीत झाली होती. वेळीच पोलिस कर्मचारी अंकुश मस्के व सहकाऱ्यांनी वाहतूक सुरळीत केली.

PRINCIPAL,
Smt. Salunkabai Raut Arts & Commerce College, WANDJA
Tq.Mangrulpir, Dist.Washim
(M.S.) Pin Code- 444402

SALUNKABAI RAUT ARTS & COMMERCE COLLEGE
Tq.Mangrulpir, Dist.Washim (M.S.) 444402
SMT. ... WANOJA

लोकमत

# क्रूझर-पिकअपचा अपघात; ११ जण गंभीर

## पेडगावनजीकची घटना : मध्यरात्री रासेयो पथकाची धावाधाव

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम :** भरधाव वेगाने जाणारे क्रूझर वाहन आणि पिकअपचा अपघात घडल्याने ११ जण गंभीर जखमी झाले. मंगरुळपीर तालुक्यातील पेडगावनजीक १६ जून रोजी सकाळी २ वाजताच्या घडलेल्या या अपघाताची माहिती मिळताच वनोजातील साळुंकाबाई राऊत महाविद्यालयाच्या रासेयो आपत्ती व्यवस्थापन पथकाने जखमींना मदत करण्यासाठी एकच धावपळ केली. नागपूर-औरंगाबाद महामार्गावर एमएच २० ईएल ८९६६ क्रमांकाचे पिकअप वाहन रात्री २ वाजता पुणे येथून नागपूरकडे भरधाव वेगाने येत होते, तर एमएच- २७ व्ही १३८१ क्रमांकाची क्रूझर नागपूरकडून येत होती. मंगरुळपीर तालुक्यातील पेडगावनजीक पिकअपने क्रूझरला जबर धडक दिली. यामध्ये क्रूझरमधील ११ जण जखमी झाले. घटनेची माहिती श्रीमती साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा रासेयो आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाचे सदस्य अनिकेत जालिंदर इंगळे व बुद्धभूषण लालसिंग सर्वे यांना मिळताच ते तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पोलीस प्रशासन तसेच ११२ व आपत्ती व्यवस्थापन समन्वयक प्रा. बापूराव डोंगरे यांना माहिती दिल्यानंतर तीन १०८ रुग्णवाहिका उपलब्ध करून घेत पोलिस प्रशासनाच्या मदतीने तत्काळ सर्व जखमींना शेलुबाजार येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये आणले. शेलुबाजार येथे उपचार करून सर्व जखमींना पुढील उपचारासाठी अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे रेफर करण्यात आले.

जखमींमध्ये संदीप कांबळे, सुदर्शन सांगळे, प्रभाकर कांडे, विनोद कुमार, ओमप्रकाश फलेजिया, नाविराज मनवरकर, राजेंद्र बांडे, राजीव टिकाईत, विलास पुरकटे, धनंजय रोकडे व मानसिंग खोकर यांचा समावेश आहे. यातील ६ जण गंभीर जखमी आहेत. जखमींसोबत कोणी नसल्याने पथकाच्या सदस्यांनी स्वतः अकोला येथे जाऊन जखमींना रुग्णालयात दाखल केले.



### वाहतूक अर्धा तास विस्कळीत

अपघात एवढा भीषण होता की क्रूझरमधील सर्व प्रवासी बाहेर फेकले गेले. या अपघातानंतर अर्धा तास नागपूर औरंगाबाद महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. वेळीच शेलुबाजार येथील पोलीस मस्के यांनी वाहतूक सुरळीत केली.

Hello Washim
Page No. 1 Jun 17, 2022
Powered by: erelego.com

PRINCIPAL,
Smt. Salunkabai Raut Arts &
Commerce College, WANOJA
Tq.Mangrulpir, Dist.Washim
(M.S.) Pin Code- 444402

SMT. SALUNKABAI RAUT ARTS & COMMERCE COLLEGE * WANOJA *
Tq.Mangrulpir, Dist.Washim (M.S.) 444402

दैनिक
विदर्भ केसरी

# श्रीमती साळुंकाबाई राऊत महाविद्यालयात आठवाआंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा..

प्रमोद सावळे /मंगरूळपीर



युजीसीच्या निर्देशानुसार तसेच 11 महाराष्ट्र बटालियन एनसीसी अकोला आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर देवेंद्र गावंडे यांच्या मार्गदर्शनात श्रीमती साळुंका बाई राऊत कला व वाणिज्य महाविद्यालयात एनसीसी विभाग, एन एस एस विभाग, तसेच स्पोर्ट विभाग यांच्या द्वारे 8 वा आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला. महाविद्यालयाच्या प्रांगणात सकाळी सात वाजता योग वर्गाला सुरुवात झाली. प्राध्यापक आकाश बुधे यांची योग प्रशिक्षणाला मार्गदर्शक म्हणून उपस्थिती लाभली. केंद्र सरकारच्या योगा डे प्रोटोकॉल नुसार योगा अभ्यास वर्ग आयोजित करण्यात आला होता. या योगा अभ्यास वर्गामध्ये प्राध्यापक बुंदे सर यांनी प्रथम प्रार्थना, शरीराच्या पूरक हालचाली, खांद्याची, कमरेची, गुडघ्याची, पायाची हालचाल, आणि आकरा योगासने, दंड स्थितीतील, व विपरीत शयन स्थितीतील, आसने, कपालभारती ,अनुलोम-विलोम इत्यादी योगा प्रकाराचे महत्व कॅडेट आणि विद्यार्थ्यांना समजावून सांगितले व त्यांच्याकडून योगा करून घेतला.

योगा डे कार्यक्रमाला महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. पी. एन. लहाने, प्रा. डॉ. एन.बी. पात्रीकर राज्यशास्त्र विभाग प्रमुख, प्रा. जया भगत वाणिज्य विभाग प्रमुख, प्रा. डी.डी. भगत इंग्रजी विभाग प्रमुख, प्रा. डॉ. एस. एस. कडू स्पोर्ट विभाग प्रमुख, लेफ्टनंट डॉ. एस. एम. बोरचाटे एनसीसी विभाग प्रमुख, प्रा. बी . एस. डोंगरे एनएसएस विभाग प्रमुख, प्रा. मुंदे सर, प्रा. गिसाळ सर, प्रा. डॉ. धोंगटे आणि सर्व शिक्षकेतर कर्मचारी इत्यादींनी योग वर्गात सहभाग घेतला त्याचप्रमाणे सदर योग वर्गाला एन.सी. सी. चे 45 कॅडेट, 40 स्वयंसेवक, आणि 10 खेळाडूंची उपस्थिती होती.

लोकमत

# वनोजाच्या रासेयो पथकाच्या कार्याची दखल



वाशिम: मंगरुळपीर तालुक्यातील वनोजा येथील श्रीमती साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा रासेयो आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाने वन्यजीव संवर्धन व संरक्षणाच्या क्षेत्रात केलेल्या उत्कृष्ट कार्याची दखल वनविभागाने घेतली आहे. जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून या पथकाला त्यांच्या कार्यासाठी प्रशस्तिपत्र देऊन काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्यात गौरविण्यात आले.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या मुख्य वनसंरक्षक व क्षेत्र संचालक ज्योती बॅनर्जी (भावसे) यांच्याकडून विशेष प्रशस्तिपत्र देऊन पथकाचा सन्मान करण्यात आला. यावेळी गुगामल राष्ट्रीय उद्यानाचे उपवनसंरक्षक सुमंत सोळंके तसेच सिपना वन्यजीवच्या उपवनसंरक्षक दिव्या भारती एम्, बुलडाणा विभागाचे उपवनसंरक्षक अक्षय गजभिये तसेच इतर उपवनसंरक्षक व वनविभागाचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते. गेल्या चार वर्षांपासून श्रीमती साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा रासेयो आपत्ती व्यवस्थापन बचाव पथक वाशिम जिल्ह्यात वन्यजीव संरक्षण व संवर्धनाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत आहे. काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्याचे वनाधिकारी पवन जाधव यांनी क्षेत्र संचालक यांना पथकाच्या या कार्याची माहिती दिली. त्यावेळी क्षेत्र संचालकांनी पथकाच्या कार्याबद्दल गौरवोद्गार काढले. यावेळी पथकाचे राहुल साखरे, सचिन राठोड, प्रवीण गावंडे, भीम वानखडे, आदित्य इंगोले, गजानन राठोड, प्रथम शिरसाट, आदी उपस्थित होते.



PRINCIPAL,
Smt. Salunkabai Raut Arts & Commerce College, WANOJA
Tq.Mangrulpir, Dist.Washim
(M.S.) Pin Code- 444402

SMT. SALUNKABAI RAUT ARTS & COMMERCE COLLEGE
Tq.Mangrulpir,
Dist.Washim
(M.S.) 444402
WANOJA

देशोन्नती

# संरक्षणाच्या क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल रासेयो पथकाचा गौरव

देशोन्नती वृत्तसंकलन...

**शेलुबाजार** ▪ जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून वने, वन्यजीव संवर्धन व संरक्षणाच्या क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल आदर्श ग्राम वनोजा येथील संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित श्रीमती. साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा रासेयो आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाला प्रशस्तीपत्र देऊन काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्यात गौरवण्यात आले.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या मुख्य वनसंरक्षक व क्षेत्र संचालक मा. ज्योती बॅनर्जी ( भा. व. से. ) यांच्या कडून विशेष प्रशस्तीपत्र देऊन पथकाचा सन्मान करण्यात आला. यावेळी गुगामल राष्ट्रीय उद्यानाचे उपवनसंरक्षक सुमंत सोळंके तसेच सिपना वन्यजीव च्या उपवनसंरक्षक दिव्या भारती एम, बुलढाणा विभागाचे उपवनसंरक्षक अक्षय गजभिये तसेच इतर उपवनसंरक्षक व वनविभागाचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते. गेल्या ४ वर्षापासून श्रीमती. साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा रासेयो आपत्ती व्यवस्थापन बचाव पथक हे वन्यजीव संरक्षण व संवर्धनाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य वाशिम जिल्ह्यात करत आहेत. याचाच गौरव म्हणून काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्याचे वनाधिकारी पवन जाधव यांनी यावेळी क्षेत्र संचालक यांना पथकाच्या कार्याची माहिती दिली त्यावेळी क्षेत्र संचालक यांनी देखील कार्याचे तोंडभरून कौतुक केले व कौतुकाची थाप दिली. यावेळी पथकाचे राहुल साखरे, सचिन राठोड, प्रविण गावंडे, ओम वानखडे, नयन राठोड व प्रथम सिंकटवार आदि उपस्थित होते. (वार्ता.)



Deshonnati Edition
Jun 7, 2022 Page No. 8
Powered by : eReleGo.com

PRINCIPAL,
Smt. Salunkabai Raut Arts &
Commerce College, WANOJA
Tq.Mangrulpir, Dist.Washim
(M.S.) Pin Code- 444402

दिव्य मराठी अकोला सिटी 16-06-2022

# श्रीमती साळुंकाबाई राऊत विद्यालयात पर्यावरण जनजागृती, स्वच्छता सप्ताह



**वनोजा** । श्रीमती साळुंकाबाई राऊत महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त पर्यावरण जनजागृती व स्वच्छता अभियान ५ ते १३ जूनपर्यंत राबवण्यात आले. या उपक्रमांतर्गत महाविद्यालय, पूर येथील मंदिर, काटेपूर्णा अभयारण्य इत्यादी ठिकाणी स्वयंसेवकांनी पर्यावरणाविषयी जनजागृती केली. त्याचबरोबर ठिकठिकाणी स्वच्छता करण्यात आली. आज संपूर्ण जग विविध पर्यावरणाविषयी समस्यांना तोंड देत आहे. या अनुषंगाने महाराष्ट्र शासन, संचालक, रासेयो संगाबाअवि यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम राबवल्या गेला. कार्यक्रमामध्ये प्रा.डॉ. देवेंद्र गावंडे, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. बापूराव डोंगरे, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. ममता पाथ्रीकर, प्रा. डॉ. गजानन घोंगटे तसेच स्वयंसेवकांनी सहभाग घेतला होता.

SALUNKABAI RAUT ARTS & COMMERCE COLLEGE
Tq.Mangrulpir, Dist.Washim (M.S.) 444402
WANOJA

तरुण भारत
Akola-Washim | 2022-06-01 | Page-1
epaper.tarunbharat.net

अकोला, बुधवार, १ जून २०२२ १

# रासेयो स्वयंसेवकांचा सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्राने सन्मान

**वाशिम जिल्ह्यातील स्वयंसेवकाचा सहभाग**



स्वयंसेवकांना प्रशस्तिपत्र देऊन गौरव करताना मान्यवर.

Powered by Erelego

दिव्य मराठी अकोला सिटी 07-06-2022

दिव्य मराठी विशेष • 'ओन्ली वन अर्थ' विषयावर विविध मान्यवरांचे मार्गदर्शन; मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत उपक्रम

# काटेपूर्णा अभयारण्यात जागतिक पर्यावरण दिवस साजरा



PRINCIPAL,
Smt. Salunkabai Raut Arts & Commerce College, WANOJA
Tq.Mangrulpir, Dist.Washim
(M.S.) Pin Code- 444402

SMT. SALUNKABAI RAUT ARTS & COMMERCE COLLEGE
Tq.Mangrulpir,
Dist.Washim
(M.S.) 444402
WANOJA

लोकमत

# वनोजाच्या रासेयो पथकाला अकोल्यात आपत्ती व्यवस्थापनाचे धडे

## अकोला जिल्हा प्रशासनाचा पुढाकार : बोट चालविण्याचे सराव सत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम :** राज्य आपत्ती व्यवस्थापन प्रतिसाद दल नागपूर व जिल्हाधिकारी कार्यालय अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने काटेपूर्णा प्रकल्प महान येथे आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण व पूर परिस्थितीमध्ये बचाव कार्य या विषयावर सराव सत्र घेण्यात आले. या अंतर्गत वाशिम जिल्ह्यातील मंगरुळपीर तालुक्यातील वनोजा येथील सालुंकाबाई राऊत महाविद्यालयाच्या पथकाला दुसऱ्यांना बोट चालविण्याचे प्रशिक्षण शनिवारी देण्यात आले.

काटेपूर्णा प्रकल्पात राबविण्यात आलेल्या सराव सत्रास जिल्हाधिकारी निमा अरोरा, निवासी उपजिल्हाधिकारी संजय खडसे, उपविभागीय अधिकारी अकोट श्रीकांत देशपांडे, मूर्तिजापूर अभयसिंह मोहिते पाटील, अकोला डॉ. नीलेश अपार, तहसीलदार अकोला सुनील पाटील, बार्शीटाकळी गजानन हमद, अकोट नीलेश मडके, तेल्हारा संतोष येवलीकर, पातूर डी.आर. बाजड, मूर्तिजापूर प्रदीप पवार, बाळापूर ए. आर. सय्यद, तसेच सर्व नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी, तलाठी, स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी, वंदेमातरम् आपत्कालीन पथक, कुरणखेड, आपत्कालीन पथक, वनोजा, शिक्षक, आर.एल. टी. कॉलेजचे रासेयो विद्यार्थी व समन्वय उपस्थित होते. प्रशिक्षण सत्राच्या यशस्वीतेसाठी तलाठी सुनील कल्ले, निमकंडे, संदीप वाघडकर व आपत्ती व्यवस्थापन अधिकारी संदीप साबळे यांनी योगदान दिले.



### पावसाळ्याच्या पृष्ठभूमीवर सराव

पावसाळ्यात पूर परिस्थितीमुळे ओढवलेल्या विविध आपत्तीचे व्यवस्थापन करण्याच्या उद्देशाने आयोजित सराव सत्रात वनोजा रासेयो आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाला बोट चालविण्याचे व हाताळण्याचे, तसेच पुरात अडकलेले नागरिक, पाण्यात बुडालेले मृतदेह कसे बाहेर काढायचे याचे प्रशिक्षण नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन विभाग जिल्हाधिकारी कार्यालय अकोला यांच्याकडून देण्यात आले. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांच्या मार्गदर्शनात सुनील कल्ले, हरिहर निमकंडे, प्रशांत सायरे यांनी हे प्रशिक्षण दिले.

Hello Washim
Page No. 3 May 16, 2022
Powered by: erelego.com

PRINCIPAL,
Smt. Salunkabai Raut Arts & Commerce College, WANOJA
Tq.Mangrulpir, Dist.Washim
(M.S.) Pin Code- 444402

Smt. Salunkabai Raut Arts & Commerce College
Tq.Mangrulpir,
Dist.Washim
(M.S.) 444402
* WANOJA *

पुण्य नगरी

# भरधाव कार उलटल्याने तीन जखमी



किन्हीराजा : येथून जात असलेल्या औरंगाबाद - नागपूर हायवे वरील नागी फाट्याजवळ भरधाव कार पलटी होवून तीन जण जखमी झाल्याची घटना १२ मे रोजी सकाळी घडली.

प्राप्त माहितीनुसार, पुणे येथून नागपूर कडे जात असताना चालकाचा ताबा सुटल्याने भरधाव कार रस्त्याच्या कडेला असलेल्या पिंपळाच्या झाडाला धडकून पलटी झाली. या अपघातात कार मधील उमेश रोकडे, लता रोकडे व लीना रोकडे हे तीन जण गंभीर जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच रासेयो आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाने घटनास्थळ गाठून गावकऱ्यांच्या मदतीने जखमींना उपचारासाठी शेलुबाजार येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात हलविले. याठिकाणी प्रथमोपचार करुन त्यांना पुढील उपचारासाठी अकोला येथे पाठविण्यात आले.

---

**Smart Washim**
Page No.2 May 13, 2022

PRINCIPAL,
Smt. Salunkabai Raut Arts &
Commerce College, WANOJA
Tq. Mangrulpir, Dist.Washim
(M.S.) Pin Code- 444402

SMT SALUNKABAI RAUT ARTS & COMMERCE COLLEGE
Tq.Mangrulpir,
Dist.Washim
(M.S.) 444402
WANOJA

## एकबुर्जी प्रकल्पावर आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शन व प्रात्यक्षिके



लोकमत

# वनोजा: राऊत महाविद्यालयात रक्तदान शिबिराला प्रतिसाद

**शेलूबाजार** : वनोजा येथील साळुंकाबाई राऊत कला व वाणिज्य महाविद्यालयात १४ जानेवारीला रक्तदान शिबिराचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्रीय छात्र सेना व शारीरिक शिक्षण विभागाच्या वतीने करण्यात आले होते. ओमायक्रॉनच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे राज्यात रक्ताचा तुटवडा निर्माण होत आहे. ही समस्या थोडी करण्याच्या जाणिवेने प्राचार्य डॉ. देवेंद्र गावंडे यांच्या मार्गदर्शनात महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना व शारीरिक शिक्षण विभागाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ऋषिकेश येवले, वैभव प्रकाश राठोड, ज्ञानेश्वर खडसे, प्रवीण गावंडे, किशोर साबळे, रुपेश चव्हाण, महादेव पठाडे, गणेश शिंदे, अजिंक्य वाकुलकर, दीपक कुरवाडे, सिद्धांत भालेराव, प्रा. डॉ. राजू कुटे, गौरव रामदास मनवर, मनोज इंगोले, आदित्य इंगोले, नयन राठोड, प्रा. आकाश आनंदा बुधे आदि २३ दात्यांनी रक्तदान केले. यावेळी प्रा.डॉ. ममता पाथ्रीकर, प्रा. जयाप्रभा भगत, प्रा. डॉ. गजानन घोंगटे, प्रा. बी.एस. डोंगरे, डॉ. सुनील चोरघाटे, प्रा. धनंजय पाथ्रीकर, डॉ. राजू कुटे, प्रा. दीपक भगत, डॉ. सचिन कढू उपस्थित होते.

Hello Washim
Page No. 2 Jan 16, 2022
Powered by: erelego.com

PRINCIPAL,
Smt. Salunkabai Raut Arts &
Commerce College, WANOJA
Tq.Mangrulpir, Dist.Washim
(M.S.) Pin Code- 444402

# दुर्मिळ मांडूळ सापाला जीवदान

SMT. SALUNKABAI RAUT ARTS & COMMERCE COLLEGE * WANOJA *
Tq.Mangrulpir, Dist.Washim (M.S.) 444402

**वाशिम संदेश, फुलचंद भगत**



वाशिम:-मंगरूळपीर तालुक्यातील वनोजा येथे निघालेल्या दुर्मिळ मांडूळ सापाला श्रीमती. साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा रासेयो आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाचे सर्पमित्र यांनी वनविभागाच्या मदतीने जंगलात सोडत जीवदान दिले.

दि.१जुलैच्या दुपारी वनोजा येथील सुभाष टोंचर यांच्या गोठ्याजवळील विटांच्या ढिगार्‍यात त्यांना एक साप जाताना दिसला. त्यांनी लगेच संबंधित घटनेची माहिती श्रीमती. साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा रासेयो आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाचे सर्पमित्र शुभम हेकड यांना दिली. माहिती वरून सर्पमित्र शुभम हेकड, प्रविण गावंडे व आदित्य इंगोले घटनास्थळी दाखल झाले.व विटांच्या ढिगार्‍यात असलेल्या ४ फुट लांब बिनविषारी दुर्मिळ मांडूळ सापाला सुरक्षित रित्या रेस्क्यू केले. सदर घटनेची माहिती कारंजा-मंगरूळपीर वनपरिक्षेत्राचे वनाधिकारी श्री. अमित शिंदे यांना दिली. नंतर वनपाल श्री. नवलकर व वनरक्षक श्री. जामकर यांनी सापाचा योग्य पंचनामा करून सदर सापाला निसर्ग अधिवासात सोडत जीवदान दिले. हा साप दुर्मिळ प्रकारात मोडत असुन ४ वर्षामध्ये वनोजा परिसरात फक्त ४ मांडूळ साप रेस्क्यू करून निसर्ग अधिवासात सोडण्यात आले. हा साप जिथे असेल तिथे पैशाचा पाऊस पडतो, गुप्तधन असते व इतर अंधश्रद्धेपोटी याची तस्करी होते. तसेच मोठ्या रोगांची औषधी निर्माण करण्यासाठी याचा वापर होत असल्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील लाखो, करोडो रुपयांमध्ये याची तस्करी होते.

PRINCIPAL,
Smt. Salunkabai Raut Arts & Commerce College, WANOJA
Tq.Mangrulpir, Dist.Washim
(M.S.) Pin Code- 444402

SMT. SALUNKABAI RAUT ARTS & COMMERCE COLLEGE
Tq.Mangrulpir,
Dist.Washim
(M.S.) 444402
WANOJA

दैनिक
# विदर्भ केसरी

# नदीत वाहून गेलेल्या वृद्धाचा मृतदेह काढला बाहेर..



## रासेयो पथकाचे धाडसी कार्य..

प्रमोद भावके
मंगरूळपीर (ता. प्र.)

काल संध्याकाळी ५ वाजता रिसोड तालुक्यातील हिवरा पेन येथे पैनगंगा नदीमध्ये सीताराम बाबुराव सरनाईक वय (८० वर्ष अंदाजे) वाहून गेले अशी माहिती वाशिम जिल्ह्याचे जिल्हा आपत्ति व्यवस्थापन अधिकारी मा. श्री. शाहू भगत सर तसेच रिसोड चे कार्यालयाचे तहसीलदार मा. श्री. अजित शेलार सर यांनी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक संस्था वनोजा द्वारा संचालित श्रीमती सालुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा रासेयो आपत्ति व्यवस्थापन बचाव पथकाचे समन्वयक प्रा. बापुराव डोंगरे यांना दिली. यानंतर प्रा. डोंगरे यांनी संबंधित माहिती पथकाचे अध्यक्ष व प्राचार्य डॉ. देवेंद्र गावंडे यांना दिली. व वाशिम जिल्ह्याचे निवासी उपजिल्हाधिकारी मा. श्री. शैलेश हिंगे सर यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाच्या सदस्यांना सर्व सुरक्षा साहित्यांसोबत हिवरा पेन येथे सकाळी च रवाना केले. व सर्च ऑपरेशन ला सुरुवात केली. ३ तासाच्या सतत सर्च ऑपरेशन नंतर सुध्दा मृतदेह आढळून आला नाही. फक्त त्यांची टोपी व काठी आढळून आली. यावेळी रिसोड चे तहसिलदार श्री. अजित शेलार यांनी देखील घटनास्थळी भेट देऊन सर्च ऑपरेशन चा आढावा घेतला. यानंतर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी मा. श्री. शाहू भगत व प्रा. बापुराव डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली सीताल सर्च ऑपरेशन राबविले व तब्बल ५ तासानंतर सदर ठिकाणापासून ७ किमी अंतरावर सदर वृद्धाचा मृतदेह एका खडकाला नदीच्या मधात आढळून आला. पथकाच्या सदस्यांनी सदर मृतदेह बाहेर काढून प्रशासनाच्या व कुटुंबाच्या ताब्यात दिला. यावेळी पथकाचे प्रविण गावंडे, ज्ञानेश्वर खडसे, सुमित राठोड, पुनेश राठोड, अनिकेत इंगळे, अभिषेक टाकरे, नामदेव इढोळ, विलास नवघरे, चंदन गव्हाणे व गणेश शिंदे (चालक) व रोशन लांभाडे आदि सदस्य यांचा मदतीने सर्च ऑपरेशन राबविण्यात आले. तहसिलदार, मंडळ अधिकारी, तलाठी दिपक मोरे तसेच गावकऱ्यांची यावेळी उपस्थिती होती.

लोकमत

# नदीच्या पुरात वृद्ध गेला वाहून, शोधकार्य सुरु!

लोकमत न्यूज नेटवर्क

**रिसोड :** तालुक्यातील पैनगंगा नदीला आलेल्या पुरात एक वृद्ध वाहून गेल्याची घटना १४ सप्टेंबर रोजी सकाळच्या सुमारास घडली.



हिवरा पेन येथे नदीमध्ये एक वयोवृद्ध वाहून गेल्याची माहिती वाशिम जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत, तसेच रिसोडचे तहसीलदार अजित शेलार यांनी श्रीमती सालुंकाबाई राऊत महाविद्यालय, वनोजा येथील रासेयो आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाचे समन्वयक प्रा. बापूराव डोंगरे यांना दिली. यानंतर प्रा. डोंगरे यांनी पथकाचे अध्यक्ष व प्राचार्य डॉ. देवेंद्र गावंडे वाशिम निवासी उपजिल्हाधिकारी शैलेश हिंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाच्या सदस्यांना सर्व सुरक्षा साहित्यांसोबत हिवरा पेन येथे सकाळीच रवाना केले. पथकाचे प्रवीण गावंडे, ज्ञानेश्वर खडसे, सुमित राठोड, पुनेश राठोड, अनिकेत इंगळे, अभिषेक टाकरे, नामदेव इढोळ, विलास नवघरे, चंदन गव्हाणे व गणेश शिंदे आदी सदस्य घटनास्थळी दाखल झाले असून सर्च ऑपरेशनला सुरुवात करण्यात आली आहे.

Hello Washim
Page No. 4 Sep 15, 2022
Powered by: ereleGo.com

PRINCIPAL,
Smt. Salunkabai Raut Arts &
Commerce College, WANOJA
Tq.Mangrulpir, Dist.Washim
(M.S.) Pin Code- 444402

Smt. Salunkabai Raut Arts & Commerce College
Tq.Mangrulpir, Dist.Washim (M.S.) 444402
WANOJA

लोकमत


# शेंदूरजना आढाव परिसरात जंगलास आग

वाशिम : शेतकऱ्याने आग लावलेल्या काडीकचऱ्याची ठिणगी उडून प्रादेशिक वनविभागाच्या जंगलास आग लागल्याची घटना शनिवार २ एप्रिल रोजी मानोरा तालुक्यातील ढोणी ते शेंदूरजना आढाव परिसरात घडली. वनविभागाच्या कर्मचाऱ्यांसह रासेयो आपत्ती व्यवस्थापन पथकातील सदस्यांनी तत्काळ धाव घेत तासभरातच ही आग नियंत्रणात आणली. तथापि, या आगीत लाखोंची वनसंपदा जळून खाक झाली. मानोरा तालुक्यातील शेंदूरजना, ढोणी परिसरात शेतकऱ्याने पेटवलेल्या काडीकचऱ्याची ठिणगी हवेने उडून नजीकच्या जंगलात पडली. आगीच्या ठिणगीमुळे या वनक्षेत्रातील जंगलात पसरलेल्या पालापाचोळ्याने क्षणार्धात पेट घेतला. दरम्यान, याच वेळी दत्तक ग्राम ढोणी येथे वसंतराव नाईक महाविद्यालय मंगरुळपीर, श्री सरस्वती समाजकार्य महाविद्यालय वाशिम, उत्तमचंद बागडीया महाविद्यालय रिसोड व साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा, [illegible] महाविद्यालयाच्या रासेयो आपत्ती व्यवस्थापन पथक रासेयो आपत्ती व्यवस्थापन पथकाचे जिल्हास्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबिर ढोणीत सुरू होते. या शिबिराच्या समारोप कार्यक्रमादरम्यानच जंगलात आग लागल्याची माहिती साळुंकाबाई राऊत महाविद्यालयाच्या रासेयो आपत्ती व्यवस्थापन पथकाला मिळाली. त्यावरून पथकातील सदस्यांनी तातडीने धाव घेत ही आग विझविण्याचे प्रयत्न सुरू केले. काही वेळाने मानोरा वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी येथे [illegible] पाहणी केली. त्यानंतर वनकर्मचारी व रासेयो पथकाने ही आग तासाभरात विझविली.



ढोणी ते शेंदूरजना आढाव परिसरातील जंगलाला लागलेली आग.

## वाशिम पंचायत समितीच्या गोडाऊनला आग



वाशिम शहरातील पंचायत समिती कार्यालयाच्या गोडाऊनला शनिवारी दुपारच्या सुमारास अचानक आग लागली. या घटनेत काही दस्तावेज जळून खाक झाले. अग्निशमन दलाच्या पथकाने तात्काळ घटनास्थळी दाखल होत आग विझविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले.



## मुलींनी केले शर्थीचे प्रयत्न

वसंतराव नाईक महाविद्यालय मंगरुळपीर, श्री सरस्वती समाजकार्य महाविद्यालय वाशिम, उत्तमचंद बागडीया महाविद्यालय रिसोड व साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा रासेयो आपत्ती व्यवस्थापन पथकातील मुले आग विझविण्यासाठी झाडाच्या हिरव्या फांद्यांचा आधार घेऊन धडपड करीत असताना या पथकातील मुलींनीही धाव घेत आग विझविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करून मोलाची मदत केली.

Hello Washim
Page No. 1 Apr 03, 2022
Powered by: erelego.com

PRINCIPAL,
Smt. Salunkabai Raut Arts & Commerce College, WANOJA
Tq.Mangrulpir, Dist.Washim
(M.S.) Pin Code- 444402

SMT. SALUNKABAI RAUT ARTS & COMMERCE COLLEGE
Tq.Mangrulpir,
Dist.Washim
(M.S.) 444402
WANOJA

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

## वनोजा लगत काटेपूर्णा अभयारण्याला आग वनसंपदा नष्ट





मंगरूळपीर /ता. प्र. वाशिम अकोला जिल्ह्यात पसरलेल्या काटेपूर्णा अभयारण्याला तालुक्यातील वनोजा जवळ दि. ३ एप्रिल रोजी दुपारी दिडच्या सुमारास आग लागल्याची घटना घडली आहे.या आगीमध्ये जवळपास १५ ते २० हेक्टर अभयारण्यातील वनसंपदा जळाल्याचा अंदाज आहे. अकोला मंगरूळपीर रोड लगत असलेल्या काटेपूर्णा अभयारण्यात मोठ्या प्रमाणात आग लागली अभयारण्यात गवत मोठ्या प्रमाणात असल्यामुळे आगीने रुद्र रूप धारण करत अभयारण्यात जोरात पसरत गेली. त्यामुळे आग विझवण्या [illegible] प्रयत्न करावे लागले.आग विझवण्यासाठी सहायक वन संरक्षण अधिकारी साबळे, काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी पवन जाधव, यांच्या मार्गदर्शनाखाली काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्याचे कर्मचारी लोक सालुबाई राऊत महाविद्यालय आपत्ती व्यवस्थापन कक्ष पथकातील सदस्य, अग्निशमक दल वनोजा येथील नागरिक यांनी अथक परिश्रम घेत चार ते पाच तासानंतर आग आटोक्यात आणली.

सदर आग कोणी धुम्रपानाने किंवा रोडच्या बाजूने खोडसाळ पणाने कुणीतरी लावली असावी अशी शक्यता आहे. संपूर्ण गवताळ वन अभयारण्यामुळे आग आटोक्यात आणण्याकरिता मोठ्या सहकार्यांना प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागली. आग कुठून व कशी लागली याबाबत शोध घेण्यात येईल कृपया कुणीही जंगलाला मुद्दाम आग लावू नये ही विनंती. आग विझविण्या करिता सर्वांनी केलेल्या सहकार्याबद्दल आभार पवन जाधव

**वन परिक्षेत्र अधिकारी काटेपूर्णा अभयारण्य**

PRINCIPAL,
Smt. Salunkabai Raut Arts &
Commerce College, WANOJA
Tq. Mangrulpir, Dist. Washim
(M.S.) Pin Code- 444402

SMT. SALUNKABAI RAUT ARTS & COMMERCE COLLEGE
Tq.Mangrulpir, Dist.Washim (M.S.) 444402
WANOJA

लोकमत

# सिलिंडरचा स्फोट; लाखोंचे नुकसान



**शेलूबाजार :** पेडगाव येथे घराला आग लागण्यासह सिलिंडरचा स्फोट झाल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाल्याची घटना २७ एप्रिल रोजी सकाळी आठ वाजेच्या सुमारास घडली. या घटनेत सुदैवाने कुठलाही मोठा अनर्थ झाला नाही.

प्राप्त माहितीनुसार, पेडगाव येथील निर्मला घातारकर यांच्या घरात बुधवारी सकाळी इंधनाने पेट घेतल्याने आगीने रौद्ररूप धारण केले. आग विझविण्यासाठी नागरिकांनी धाव घेतली असता घरातील सिलिंडरचा स्फोट होऊन योगेश शिंदे, विष्णू डाळ, राजू जावळे, पप्पू देशमुख, विठ्ठल इंगोले हे किरकोळ जखमी झाले. आग विझविण्यासाठी स्थानिक नागरिक, सा. रा. महाविद्यालय (वनोजा), रासेयो आपत्ती व्यवस्थापन पथक आणि अग्निशमन दलाच्या पथकाने प्रयत्न केले.

महसूल प्रशासनाकडून घटनेचा पंचनामा करण्यात आला असून, घरातील साहित्यासह एकूण १ लाख ७ हजार रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अहवाल प्रशासनाकडे सादर करण्यात आला. सिलिंडरचा स्फोट होऊन रमेश प्रल्हाद खरावे यांचे घराच्या भिंतीलाही तडे गेले, तसेच दिलीप टोंचर यांच्या घरातील साहित्याचेसुद्धा नुकसान झाले.

Hello Washim
Page No. 4 Apr 28, 2022
Powered by: erelego.com

PRINCIPAL,
Smt. Salunkabai Raut Arts & Commerce College WANOJA
Tq.Mangrulpir, Dist.Washim

SMT. SALUNKABAI RAUT ARTS & COMMERCE COLLEGE * WANOJA *
Tq.Mangrulpir,
Dist.Washim
(M.S.) 444402

लोकमत

# जंगलास पुन्हा आग; मध्यरात्री आणली नियंत्रणात

## वन विभागासह रासेयो पथकाची रात्री धावपळ

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम :** जंगलात वणवा पेटण्याच्या घटना दिवसेंदिवस वाढतच असून, रविवार १ मे रोजी रात्री मंगरुळपीर तालुक्यातील पांगरी महादेव परिसरात पुन्हा जंगलास आग लागण्याची घटना घडली. वनोजा येथील साळुंकाबाई राऊत महाविद्यालयातील रासेयो बचाव आपत्ती व्यवस्थापन पथकाच्या सदस्यांनी वनविभागाच्या सहकार्याने रात्री ११ वाजता अथक परिश्रमाने ही आग नियंत्रणात आणली.



मंगरुळपीर तालुक्यातील पांगरी महादेव येथे रविवारी रात्री प्रादेशिक जंगलास आग लागली. या घटनेची माहिती संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजाच्या सदस्यांना मिळताच पथकाचे सदस्य घटनास्थळी दाखल झाले. घटनेची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी शैलेश हिंगे तसेच जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत, कारंजा-मंगरुळपीर वनपरिक्षेत्राचे वन परिक्षेत्र अधिकारी अमित शिंदे व आपत्ती व्यवस्थापन समन्वयक प्रा. बापूराव डोंगरे यांना देण्यात आली.

यानंतर वनविभागाचा चमूही घटनास्थळी दाखल झाला. पथकाचे सदस्य व वनविभागाच्या कर्मचाऱ्यांना तब्बल २ तासांनंतर आग नियंत्रणात आणण्यात यश आले.

झाडांच्या फांद्या, फायर ब्लोअरच्या सहाय्याने या परिसरात असलेल्या आगीवर रात्री ११ वाजता नियंत्रण मिळवण्यात आले. पथकाच्या सदस्यांनी वेळीच तत्परता दाखविल्याने मोठ्या प्रमाणात जंगल व जैवविविधता वाचू शकली आहे. ही आग नियंत्रित करण्यासाठी पथकाचे ओम वानखडे, सचिन राठोड, ज्ञानेश्वर खडसे, नयन राठोड, शरद श्रीखंडे, सुमित राठोड, विशाल राऊत व वनविभागाचे कर्मचारी आदींनी अथक परिश्रम घेतले.

Hello Washim
Page No. 1 May 04, 2022
Powered by: erelego.com

PRINCIPAL,
Smt. Salunkabai Raut Arts & Commerce College, WANOJA
Tq.Mangrulpir, Dist.Washim
(M.S.) Pin Code- 444402

देशोन्नती

# क्रुझर पलटी; ३ जण जखमी



देशोन्नती वृत्तसंकलन...

**शेलूबाजार** ■ नजीकच्या पार्डीताड फाट्याजवळ क्रुझर पलटी झाल्याची घटना सोमवार दि.२ मे रोजी सकाळी घडली. या अपघातात तीन जण जखमी झाले असून एकाची अवस्था गंभीर असल्याने त्यांना तातडीने उपचाराकरिता अकोला येथे हलविण्यात आले आहे.

आटोपून भाविक घरी जात असतांना पार्डी ताड फाट्यानजीक सकाळी ७ च्या दरम्यान क्रुझर पलटी झाल्याची घटना घडली.कुल्झर चा समोरील टायरच्या टायरचं बॉल जॉईंट तुटला असल्याने अपघात झाला असल्याचे त्या गाडीतील एका प्रवाशांनी सांगितले . या अपघातात तिघांना गंभीर दुखापत झाली असल्याने त्यांना तातडीने श्रीमती साळुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा रासेयो आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाच्या सदस्यांनी १०८ रुग्णवाहिकेने नजीकच्या शेलूबाजार येथील आरोग्य केंद्रात हलविले तेथून यांना पुढील उपचाराकरिता अकोल्याला रवाना करण्यात केले. हे सर्व प्रवाशी आसोला हांडे येथील रहिवाशी असल्याचे समजते.

जखमीमध्ये माणिक जाधव वय ६०, रामस्वरुप दास महाराज, वय ६५ ,किसन राठोड वय ६० यांचा समावेश आहे. यावेळी जखमींना तातडीने मदत करण्यासाठी पथकाचे सदस्य ओम वानखडे ,मोहन सावके, व पांडुरंग कोठाडे यांनी प्रयत्न केले.(वार्ता.)

Deshonnati Edition
May 3, 2022 Page No. 5
Powered by : eReleGo.com

SMT. SALUNKABAI RAUT ARTS & COMMERCE COLLEGE
Tq.Mangrulpir, Dist.Washim (M.S.) 444402
WANOJA

PRINCIPAL,
Smt. Salunkabai Raut Arts & Commerce College, WANOJA
Tq. Mangrulpir, Dist.Washim
(M.S.) Pin Code- 444402

लोकमत



# भरधाव कार झाडावर धडकली; तीन जखमी

**वाशिम:** भरधाव कार झाडाला धडकून घडलेल्या अपघातात तीन जण जखमी झाले. ही घटना नागपूर-औरंगाबाद महामार्गावर गुरुवारी सकाळी सहा वाजताच्या सुमारास घडली. यामध्ये २ महिला व एका पुरुषाचा समावेश आहे.

पुणे येथून एक कुटुंब गुरुवारी सकाळी एम.एच.३३ ए - ५६८९ क्रमांकाच्या कारने नागपूरकडे जात असताना चालकाला औरंगाबाद-नागपूर महामार्गावरील नागी गावानजीक डुलकी आली. यामुळे कारवरचे नियंत्रण सुटून ही कार मार्गालगतच्या झाडावर धडकली. ही धडक एवढी जोरदार होती की, कारचा समोरचा पूर्ण भाग पूर्णपणे चुराडा झाला. यात उमेश रोकडे, लता रोकडे आणि लीना रोकडे हे तिघे गंभीर जखमी झाले. या अपघाताची माहिती वनोजा येथील साळुंकाबाई राऊत महाविद्यालयातील रासेयो आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाला मिळताच पथकाचे सदस्य तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाच्या सदस्यांनी १०८ रुग्णवाहिकेच्या साह्याने व गावकऱ्यांच्या मदतीने या जखमींना उपचारासाठी शेलुबाजार येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आणले. तेथे प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी अकोला येथे हलविले.

Hello Washim
Page No. 1 May 13, 2022
Powered by: erelego.com

SMT. SALUNKABAI RAUT ARTS & COMMERCE COLLEGE
Tq.Mangrulpir,
Dist.Washim
(M.S.) 444402
WANOJA

PRINCIPAL,
Smt. Salunkabai Raut Arts &
Commerce College, WANOJA
Tq.Mangrulpir, Dist.Washim
(M.S.) Pin Code- 444402

# काळवीटाला मिळाले जीवदान

## भरधाव वाहनांमुळे वन्यप्राण्यांचा जीव येतोय धोक्यात



**विश्वजगत**
**सचिन संघई**
**वृत्त - विशेष**

SALUNKABAI RAUT ARTS & COMMERCE COLLEGE
Tq.Mangrulpir, Dist.Washim (M.S.) 444402
SHT. * WANOJA *

PRINCIPAL,
Smt. Salunkabai Raut Arts &
Commerce College, WANOJA
Tq.Mangrulpir, Dist.Washim
(M.S.) Pin Code- 444402

लोकमत

# कुत्र्याच्या तावडीतून काळविटाची सुटका

**वाशिम** : मोकाट कुत्र्यांनी घेरलेल्या काळविटाचा जीव धोक्यात आल्याची माहिती मिळताच वनोजा येथील श्रीमती सालुंकाबाई राऊत महाविद्यालय वनोजा रासेयो आपत्ती व्यवस्थापन पथकाच्या सदस्यांनी घटनास्थळी पोहोचत या काळविटाची सुटका करीत त्याचा जीव वाचविला. ही घटना वाशीम-शेलूबाजार मार्गावर शुक्रवारी दुपारच्या सुमारास घडली.

वाशीम-शेलूबाजार मार्गावरील एका शेतात रखरखत्या उन्हात एक काळवीट जखमी अवस्थेत विव्हळत होते. त्याला गंभीर दुखापत झाल्याने त्याच्या पोटातून रक्तस्राव सुरू होता. त्यातच कुत्र्यांनी त्याला घेरून लचके तोडण्याचा प्रयत्न सुरू केला. ही माहिती सालुंकाबाई राऊत महाविद्यालयाच्या रासेयो पथकाला मिळाली. त्यांनी याबाबत महिला वनरक्षक अहिरे, आपत्ती व्यवस्थापनाचे समन्वयक बापूराव डोंगरे यांना दिली व घटनास्थळ गाठून तातडीने वनविभागाच्या कर्मचाऱ्यासह वाहनाने जखमी काळविटाला शेलूबाजार येथील प्राथमिक आरोग्य केंद्रावर आणले.

Hello Washim
Page No. 3 May 08, 2022
Powered by: erelego.com

Smt. Salunkabai Raut Arts & Commerce College, Wanoja, Tq. Mangrulpir, Dist. Washim (M.S.) 444402

PRINCIPAL,
Smt. Salunkabai Raut Arts & Commerce College, WANOJA
Tq.Mangrulpir, Dist.Washim
(M.S.) Pin Code- 444402